लोकमत

# परीक्षांना अत्यावश्यक सेवेत सहभागी करा

नागपूर : कोरोना संक्रमणावर नियंत्रण मिळविण्यासाठी राज्य सरकारने 'ब्रेक दी चेन' मोहीम सुरू केली आहे. त्याअंतर्गत केवळ अत्यावश्यक सेवा वगळता शेष सेवांवर कठोर निर्बंध लादले आहेत. यामुळे, परीक्षा व परीक्षा कार्य बाधित होत असल्याची भावना राज्यभरातील विद्यापीठांचे कुलगुरू व्यक्त करत आहेत. त्यामुळे, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांच्याकडे कुलगुरूंनी परीक्षांना अत्यावश्यक सेवांमध्ये सहभागी करण्याची मागणी केली आहे. मात्र, या मागणीवर राज्य सरकारकडून अद्याप कोणताही निर्णय घेतला गेला नाही.

सामंत यांच्यासोबत २२ एप्रिल रोजी कुलगुरूंची बैठक पार पडली. परीक्षांना अत्यावश्यक सेवांमध्ये सहभागी केल्यास विश्वविद्यालयांतील परीक्षांसंदर्भातील कामांमध्ये वेग येईल, अशी भावना यावेळी कुलगुरूंनी व्यक्त केली होती. वर्तमानात निर्बंधांमुळे परीक्षेसंदर्भातील कामे प्रभावित होत आहेत. परीक्षा कार्यांशी जुळलेल्या कॉलेज व विद्यापीठांच्या कर्मचाऱ्यांना समस्यांचा सामना करावा लागत आहे. शासकीय निर्देशानुसार केवळ १५ टक्के कर्मचारीच उपस्थित राहू शकत आहेत. त्याचा परिणाम परीक्षांवर होत आहे. निर्बंधांमुळे विद्यापीठांना २६ एप्रिलपासून सुरू होत असलेल्या १२ अभ्यासक्रमांच्या परीक्षा रद्द कराव्या लागल्या आहेत. अशाच प्रकारचे कठोर निर्बंध सुरू राहिल्यास चवथ्या सत्राच्या परीक्षाही रद्द कराव्या लागण्याची शक्यता आहे.

Kolhapur Main
Page No. 6 Apr 25, 2021
Powered by: erelego.com

# राज्यातील कृषी पदव्यांना 'बीएस्सी ॲग्रि' समकक्षतेचा दर्जा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** राज्यातील चारही कृषी विद्यापीठातील पदवी अभ्यासक्रम बीएस्सी ॲग्रि (ऑनर्स) या पदवी अभ्यासक्रमाला समकक्ष ठरवण्यात आले आहे. पदवी अभ्यासक्रमाच्या नावांमध्ये बदल झाल्याने कृषी पदवीधारक विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा आणि भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या परीक्षा देण्यात अडचणी येऊ लागल्याने राज्य शासनाने हा निर्णय घेतला.

सरकारच्या कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाने याबाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला आहे. भारतीय कृषी अनुसंधान परिषदेने कृषी



अभ्यासक्रमांना व्यावसायिक अभ्यासक्रम म्हणून घोषित केले आहे. त्यामुळे या पदवी अभ्यासक्रमांच्या नावांमध्ये बदल करण्यात आला आहे. मात्र, या नामबदलामुळे कृषी शाखेच्या विद्यार्थ्यांना परीक्षा देण्यात अडचणी येतात. त्यामुळे राज्य शासनाच्या कृषी परिषदेच्या १०४ व्या बैठकीत विविध कृषिपदवी अभ्यासक्रमांना बीएस्सी ॲग्रि अभ्यासक्रमाच्या पदवीच्या समकक्षतेचा दर्जा देण्याचा निर्णय घेण्यात आला.

बीएस्सी ॲग्रि समकक्षतेचा दर्जा मिळालेल्या अभ्यासक्रमांमध्ये बीएस्सी उद्यानविद्या, बीएस्सी वनविद्या, बीएस्सी सामाजिक विज्ञान, बीएफएस्सी (मत्स्य विज्ञान), बीटेक (कृषी अभियांत्रिकी), बीटेक (अन्न तंत्रज्ञान), बीटेक (जैव तंत्रज्ञान), बीएस्सी (एबीएम)/ बीबीएम (कृषी)/ बीबीए (कृषी), बीएस्सी कृषिव्यवसाय व्यवस्थापन यांचा समावेश आहे. या निर्णयामुळे कृषी शाखेत विविध अभ्यासक्रम करणाऱ्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षण आणि परीक्षांना अडचण निर्माण होणार नाही. त्यामुळे राज्यातील विविध कृषी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे.

# 'महावीर'चे विद्यार्थी विद्यापीठ गुणवत्ता यादीत अव्वल

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा)** : शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत महावीर महाविद्यालयाच्या १५ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.

मार्च २०२० मध्ये झालेल्या परीक्षांची विद्यापीठ गुणवत्ता यादी नुकतीच जाहीर झाली आहे. यात महावीर महाविद्यालयाच्या एम.ए. भाग २ (इंग्रजी) वर्गातील प्रज्ञा सिद्धेश्वरने इंग्रजी विषयाच्या गुणवत्ता यादीत प्रथम क्रमांक पटकाविला. विद्यापीठाच्या सात नामवंत गुणवत्ता पारितोषिकांची ती मानकरी ठरली. प्रतिमा भोसलेने गुणवत्ता यादीत तृतीय क्रमांक मिळविला आहे. मानसशास्त्र भाग- २ मधील काव्या गगनग्रास ही विद्यार्थिनी विद्यापीठात मानसशास्त्र विषयात प्रथम आली आहे. सामाजिकशास्त्र शाखेत ती प्रथम आहे. पूजा बावचे, मुक्ता घाटगे यांनी गुणवत्ता यादीत अनुक्रमे आठवा व दहावा क्रमांक मिळविला. बी.ए.बी.एड्. भाग-४ मधील पहिले दहा विद्यार्थी महाविद्यालयाचेच आहेत. विद्यार्थ्यांना इंग्रजी विभागाच्या समन्वयक डॉ. कल्पना गंगातीरकर, मानसशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. भरत नाईक, डॉ. शिरीष शितोळे, डॉ. सुरेश संकपाळ यांचे सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन ॲड. के. ए. कापसे, सचिव मोहन गरगटे, प्राचार्य डॉ. राजेंद्र लोखंडे यांनी अभिनंदन केले.

पुण्यनगरी

प्रासंगिक



प्रा. डॉ. विजय ककडे

# भगवान महावीर : सम्यक विचाराचा रत्नत्रय

**व्हॉट्सॲप फेसबुक यासारखी प्रसारमाध्यमे विश्वव्यापी आंतरजाल यातून समज वाढविण्यापेक्षा गैरसमज, द्वेष, हिंसा पसरवू शकतात. यामध्ये साधनांचा दोष नाही, तर वापरकर्त्यांचा आहे. यातून सम्यक दर्शन होत नसल्याने सम्यक ज्ञान मिळत नाही व परिणामी सम्यक चारित्र्य घडत नाही. महावीर यांची सम्यक विचारसरणी सध्याच्या तंत्रयुगात अतिशय महत्त्वाचे असून, मानवतावादी आधारित लोकशाहीसाठी त्याची नितांत आवश्यकता आहे.**

जैन धर्माचे प्रथम तीर्थंकर 'वृषभनाथ ते २४ वे तीर्थंकर भगवान महावीर' अशी अडीच हजार वर्षांपेक्षा अधिक श्रमण परंपरा असणारा जैन धर्म हा देव नाकारणारा आहे. सर्व तीर्थंकर हे मार्ग दाखविणारे दीपस्तंभ असून, प्रत्येकाला स्वतः प्रयत्नपूर्वक मोक्षपद वाटचाल करावयाची आहे. सामाजिक, राजकीय, आर्थिक, आरोग्यविषयक अशा सर्व स्तरावर समाज विविध प्रश्नांनी ग्रासलेला असतो, तेव्हा भगवान महावीर प्रकाश मार्ग ठरतात. यासाठीच भगवान महावीर यांची मूलतत्त्वे, त्याचा व्यावहारिक संदर्भ आणि भविष्यकालीन संपन्न आनंददायी मानवी जीवनास आवश्यक असणारा मतितार्थ तपासणे महत्त्वाचे ठरते. सध्याचे सभोवतालचे वास्तव नव्या शास्त्रशुद्ध,निसर्गपूर्ण जीवनशैलीचा अहिंसा आधारित धर्माची आवश्यकता प्रकर्षाने जाणवून देणारे आहे. अहिंसा आधारित जीवन कल्याणकारी असल्याने प्रत्येकाने याचे आपल्या जीवनात अनुसरण केल्याने प्रथम स्वतःचा, कुटुंबाचा अंततः सर्व समाजाचा फायदा होणार आहे.

**भगवान महावीर विचारांचा कोहिनूरः रत्नत्रय**

रत्नत्रय म्हणजे सम्यक दर्शन, सम्यक ज्ञान व सम्यक चारित्र्य या आधार घटकातून सर्वच क्षेत्रांत योग्य माहिती योग्य ज्ञान, योग्य कृती घडून येतील.अनेक गैरसमज, तणाव, संघर्ष, युद्ध ही रत्नत्रयाच्या अभावातून एकांगी अतिरेकी विचारातून जन्मास येतात.

सम्यक दर्शन हे रत्नत्रय सूत्रातील प्रथम सूत्र असून, त्यामध्ये प्रत्येक घटना,विचार, व्यक्ती यांच्या अनेक बाजू असतात व त्या सर्व पाहिल्यानंतरच होणारे दर्शन किंवा माहिती ही सम्यक होते. आज सर्वत्र पारस्परिक अविश्वास, एकाच मताचा टोकाचा आग्रह व इतरांनी तो स्वीकारावा यासाठी होत असलेली दडपशाही राजकीय, धार्मिक व आर्थिक क्षेत्रात दिसते. सर्व धर्मांची मुलसूत्रे सारखीच असून, धर्मांच्या व शांततेच्या नावाखाली झालेली युद्धे व रक्तपात सर्वाधिक आहे. आपले मत बरोबर असल्याचा आग्रह सोडून तथ्यांच्या आधारे तपासणी करणारी विचारसरणी स्वीकारली. हीच शास्त्रीय दृष्टिकोन म्हणून सर्वत्र स्वीकारली गेली व शास्त्राधारे शोधल्या गेलेल्या शोधातून मानवी जीवन संपन्न झाले. आपण सत्यशोधक होऊन वास्तवाचे दर्शन घ्यावयाचे झाल्यास, प्रथम सम्यक दर्शनाचा स्वीकार व वापर हा प्रारंभ ठरतो. सात आंधळे हत्तीचे दर्शन घेतात व आपापल्या परीने हत्तीचे वर्णन करतात; परंतु हे हत्तीचे सर्व दर्शन एकत्रित केल्यास, सम्यक दर्शन होते, तेव्हा त्याचे वास्तव दर्शन होते. आर्थिक क्षेत्रात साम्यवाद फक्त बाजार यंत्रणा या ऐवजी त्याचा आवश्यकतेनुसार वापर करणारी व्यवस्था अधिक हितकारी ठरते. हाच समन्वित दृष्टिकोन विविध क्षेत्रांत स्वीकारल्याने आपणास वास्तवाचे दर्शन होते. विविध शास्त्र शाखा आता पुन्हा एकत्र येऊन प्रश्न समजून घेत आहे परिणामी समज वाढत आहे. सम्यक दर्शनाची पहिली पायरी पूर्ण केल्यानंतर सम्यक ज्ञान प्राप्त होते, हे सम्यक विज्ञान सम्यक दर्शन यातून प्राप्त होऊन, पुढे सम्यक चारित्र्यात परिवर्तित होते.



सम्यक चारित्र्य हे सम्यक दर्शन व सम्यक-ज्ञान यातून दैनंदिन व्यवहारात निर्णय प्रक्रियेत आणि वर्तनात अमलात आणत आणले जात असते. जर असे घडले, तरच पूर्वीच्या दोन टप्प्यांना अर्थ राहतो अन्यथा क्रियेवीण वाचाळता व्यर्थ ठरते. अपुरे, एकांगी ज्ञान व सत्ता यांचा संयोग किती विनाशकारी असतो, हे आपण पाहात आहोत. सम्यक चारित्र्य साधन व साध्य यात आवश्यक असणारी नैतिकता प्रस्थापित करते. याच्या अभावातून भ्रष्टाचार, शोषण, विषमता वाढीस लागते. आर्थिक सुबत्ता आवश्यक आहे; परंतु अशी सुबत्ता, वेगवान प्रगती ही मनुष्य जातीस अधिक अस्थिर व विनाशाच्या वाटेवर नेत आहे. पर्यावरणाचा प्रचंड विध्वंस करीत रोजगार घटवत साध्य केलेला विकास ही आजारी स्वरूपाची सूज ठरते. प्रगतीसाठी माणूस की, माणसासाठी प्रगती असा प्रश्न पडण्याचे कारण सम्यक चारित्र्याचा अभाव होय. सम्यक चारित्र्य हे व्रत सार्वकालिक असून हीच जीवननिष्ठा आहे. कोणत्याही घटनेवर, अनुभवावर अंधश्रद्धपणे विश्वास न ठेवता, चव, स्पर्श, श्रुती, दृष्टी, श्रवण या आधारे पंचेंद्रिय यांचा वापर करीत सम्यक दर्शन घ्यावे लागते. सध्या माहिती - तंत्रज्ञानाच्या युगात प्रचंड वेगाने विविध पद्धतीने माहिती येत असते. ही माहिती, एकांगी दर्शन चुकीच्या मार्गावर जाऊ शकते, व्हॉट्सॲप फेसबुक यासारखी प्रसारमाध्यमे विश्वव्यापी आंतरजाल यातून समज वाढविण्यापेक्षा गैरसमज, द्वेष, हिंसा पसरवू शकतात. यामध्ये साधनांचा दोष नाही, तर वापरकर्त्यांचा आहे. यातून सम्यक दर्शन होत नसल्याने सम्यक ज्ञान मिळत नाही व परिणामी सम्यक चारित्र्य घडत नाही. महावीर यांची सम्यक विचारसरणी ही सध्याच्या तंत्रयुगात अतिशय महत्त्वाच्या अशा मानवतावादी आधारित लोकशाहीसाठी त्याची नितांत आवश्यकता आहे, हे महावीर यांच्या विचारांचा दैनंदिन जीवनात स्वीकार करणे, हीच खरी वंदना भगवान महावीर यांना त्यांच्या जयंतीनिमित्त देता येईल.

संपर्क : ९४२२४२३९४१

25 APR 2021

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महावीर.. अहिंसेचा विश्वधर्म

जैन धर्माची व्याप्ती संख्यात्मक निकषावर जरी मर्यादित दिसत असली तरी आता जिन सूत्र होय शांततामय सहजीवन अशक्य असल्याची जाणीव वृद्धिंगत होत आहे. अहिंसा आधारित शाकाहार व आहार विषयक नियम हे अनारोग्य पासून म्हणजे मधुमेह, रक्तदाब, चिंता यातून मुक्त करतात हे आता सर्वपरिचित झाले असून त्याची स्वीकृतता वॅगन चळवळीतून वाढत आहे. पुन:श्च पर्यावरणीय निसर्गानुकूल जीवनशैली स्वीकारून आरोग्यसंपन्न, समाधानी व स्पर्धा ऐवजी सहकार यांची नवी प्रणाली उदयास येत आहे. यालाच उबंटू असे आफ्रिकन नाव असून सहभागिता व वाटप यावर ही पद्धत आधारित आहे.

### जैन धर्माची पंचमहा तत्वे व आधुनिक जीवन पद्धती

जैन धर्माची ओळख अहिंसा तत्त्वांनी होत. युद्ध करून साम्राज्यविस्तार ऐवजी काम, क्रोध, मद, मोह, माया, मत्सर या शत्रूंना जिंकण्याचे जिन तत्व स्वीकारले गेले. आपण जे कर्म करतो तेच पुन्हा आपणास प्राप्त होत असल्याने हिंसेचा त्याग हा स्वार्थ असतो. आपण जे पेरले तेच उगवणार व त्याची फळे आपणास मिळणार असल्याने संघर्ष, युद्ध हे कोणत्याच प्रश्नाचे उत्तर असू शकत नाही. दया, परोपकार, स्नेह, प्रेम हीच महत्त्वाची शस्त्र असून त्यातून प्राप्त होणारा विजय शाश्वत राहतो. जिन पंचमहा तत्वे हा जैनधर्माचा पंचप्राण असून त्यामध्ये अहिंसा, अस्तेय/अचौर्य, अपरिग्रह, सत्य, ब्रह्मचर्यही पंच सूत्रे किंवा महाव्रते स्वीकारल्याने सम्यक जीवनशैली प्राप्त होते.

### अहिंसा व शाकाहार : समृद्ध जीवन शैली चे सुवर्ण नाणे

जेव्हा प्राचीन समाजात यज्ञ कर्मकांड यात उत्तम पशुचा बळी दिला जात होता त्यातून निर्माण होणारा भयावह परिणाम याचे उत्तर म्हणून अहिंसा तत्त्व आधारित धर्म स्थापना झाली. सर्व तीर्थंकर हे युद्ध व हिंसा यांच्या सामाजिक परिणामाचे व त्यातून निर्माण होणाऱ्या अखंडित क्रोध साखळी याचे खंडन करण्यासाठीच अहिंसेचे पुरस्कर्ते होते. क्रोध व हिंसा यांनाशांततेने जिंकणे व तसेच शांततेने ने उत्तर देणे ही अत्यंत विरोधी व क्रांतिकारी शैली समाजास पचनी पडणे व त्यात सातत्य ठेवणे अवघड असल्याने सर्व २४ तीर्थंकर यांनी अहिंसा मार्गाचा पुरस्कार केला. अहिंसा पूर्णत: आपल्या आचरणात घेण्यासाठी मांसाहारआधारित अन्न देखील त्याज्य ठरते. सर्व प्रकारच्या मांसाहार हा तसा आहार घेणाऱ्या हिंसात्मक प्रवृत्ती निर्माण करणारा असतो याचा शास्त्रीय सत्य स्वीकृत झाले आहे. शुद्ध सात्विक आहार तोही मर्यादित प्रमाणात गरजे इतकाच घ्यावयाचा आहे. अनेक जैन कुटुंबात आपल्या जेवणाचे तट धून ते पाणी पिण्याची प्रथा आहे. आज अनेक कुटुंबातून तसेच हॉटेलमध्ये पाणी आणि अन्न यांची प्रचंड नासाडी होते. याबाबत बेंगलोर मधील एका व्यक्तीने हॉटेलमध्ये फक्त अर्धा ग्लास पाणी देणे अशी चळवळ सुरू केली व त्यात पिण्याचे पाणी मोठ्या प्रमाणात वाया जाणे थांबले. अशाप्रकारची नासाडी टाळली तर त्यातून अनेक भुकेकंगाल पुरेसे भोजन करू शकतील तहानलेल्या लोकांना पाणी मिळेल. शाकाहार हाच सर्वोत्तम आहार असून तो निरोगी शैलीत शरीरास आवश्यक औषध आहे.



अस्तेय किंवा हे तत्व जैन धर्माप्रमाणेच अनेक इतर धर्माच्या ब मूलतत्व समाविष्ट आहे. जे आपले नाही ही दुसऱ्याच्या आहेत त्याचे अभिलाषा ठेवणे विनापरवाना विनामोबदला वापरणे हे सर्व टाळणे म्हणजे होय चौर्य किंवा अस्तेय होय. हव्यास हेच चोरीचे मूळ असून त्यातून सामाजिक व आर्थिक विषमता तयार होते. मात्र एखाद्या व्यक्तीस समाजास जर जीवन जगण्याची साधनेच नाकारले तर ती व्यक्ती अथवा समाज चोरीचा मार्ग नाईलाजाने स्वीकारतो. अस्तेय हे तत्व अति परिग्रह प्रवृत्तीशी जोडलेले असल्याने आपणास सोबत अपरिग्रह या महा व्रताचा विचार करावा लागतो.

सद्यस्थितीतील सर्वात मोठी सामाजिक आर्थिक व राजकीय अशा तिन्ही क्षेत्रांत दिसणारी समस्या ही परीग्रहांचा अतिरिक्त अशी आहे. संपत्ती व उत्पन्नातील विषमता या बाबतचा आलेख सातत्याने वाढत आहे. थोमास पिकेट्टी यांनी एकविसाव्या शतकातील भांडवल या ग्रंथात विस्तृतपणे याबाबत विवेचन केले असून भारतातही ही अति श्रीमंताची संख्या वाढत आहे. राजकीय क्षेत्रात पदाचा परिग्रह तीव्र स्वरूपात असून आपल्याच घराण्यात अधिक पदे असावे असा प्रयत्न केला जात आहे. यातून संपत्ती संकलनाचे व्यसन वाढत असून त्याचा परिणाम म्हणून केवळ एक टक्के लोकांकडे त्यातील ४० टक्के लोकांकडील एकूण संपतीपेक्षा अधिक संपत्ती आहे. अशा विषमताच्या पार्श्वभूमीवर अपरिग्रहाचे महाव्रत महत्त्वपूर्ण ठरते आहे. नैतिकता ही संस्कारातून येत असल्याने त्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करणे आवश्यक ठरते. कोरोना महासंकटात आपण मदत देऊन परिग्रह कमी करू शकतो. भ्रष्टाचाराचे वाढते प्रमाण व त्याची साखळीबद्ध रचना हे देखील आत्यंतिक परीग्रहाचे फलित आहे. पंच महा तत्वे ही साखळी असून ती परस्परपूरक आहेत. सत्य आणि ब्रह्मचर्य ही महानैतिक जीवनाचा पाया आहे. सत्याचे प्रयोग करणारे महात्मा गांधी यांना विसाव्या शतकातील सर्वात महान जैन असे म्हणावे लागते. सत्य बहुआयामी असल्याने प्रत्येक निर्णय रत्नत्रयाच्या आधारे घेतल्यास सत्य महाव्रत याचे पालन होते. सत्याचा संस्कार कुटुंबापासून सुरू होत असल्याने आपले दैनंदिन वर्तन मुलांच्या समोर आदर्श होत असते याची जाणीव महत्त्वपूर्ण ठरते. आपण दैनंदिन व्यवहारात अनेक ठिकाणी खोटेपणा फसवणूक दुटप्पीपणा करत असल्याने यांचाच प्रभाव कुटुंबावर असतो. हव्यासातून येणारे समाधान श्रीमंती अल्पकाळ असते परंतु नंतर येणारे नैराश्य आनंदाच्या कितीतरी अधिक पट दु:खदायी असते. जैन व्यापारी उद्योजक या क्षेत्रात अग्रगण्य आहेत ते सर्व व्यवसाय जैन तत्वांना पूरक असल्याचे दिसते हा केवळ योगायोग नाही तर जैन धर्मियांची व्यावहारिकता आहे स्त्री समानता शिक्षणातून येत असते हे ओळखून जैन समाजात स्त्रियांचे शिक्षण प्राधान्याने पाहिले जाते. त्यामुळेच २०११ च्या जनगणनेत स्त्री साक्षरतेचे जैन समाज प्रथम क्रमांकावर होता आपल्या समाजाचा हा सुवर्ण वारसा सध्याच्या संघर्ष, अतिरेकी वातावरण एखाद्या दीपस्तंभाप्रमाणे असून आपले सर्व तीर्थंकर मानवी कल्याणाचा मार्ग आजही दाखवत आहे. जैन धर्म तत्वे हीच संपूर्ण मानव जातीला विश्व धर्माकडे शकतील.

**समाप्त**

- डॉ. विजय ककडे, प्राध्यापक, समन्वयक
भगवान महावीर अध्यासन
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत

डॉ. ककडे : महावीर जयंतीनिमित्त विद्यापीठात कार्यक्रम

# महावीरांचे तत्त्वज्ञान विनाशापासून वाचवेल

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** भगवान महावीर यांचे अहिंसात्मक तत्त्वज्ञानच जगाला महाविनाशापासून वाचवेल, असा आशावाद शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनाचे समन्वयक डॉ. व्ही. बी. ककडे यांनी व्यक्त केला.

भगवान महावीर जयंतीच्या पूर्वसंध्येला शिवाजी विद्यापीठाच्या 'शिव वार्ता' यू ट्यूब वाहिनीवरील 'शिव वार्ता संवाद' या कार्यक्रमांतर्गत 'महावीर की महाविनाश?' या विषयावर डॉ. ककडे यांची विशेष मुलाखत जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी घेतली.

डॉ. ककडे म्हणाले, नैसर्गिक साधन संपत्तीची अपरिमित हानी, सत्तासंघर्ष, संपत्तीचे केंद्रीकरण आदी अनेक कारणांनी जग एका मोठ्या विनाशाकडे निघाले आहे. या विनाशापासून जगाला वाचवायचे असेल तर भगवान महावीरांच्या सत्य, अहिंसा, अस्तेय आणि अपरिग्रह या मूल्यांचा अंगीकार प्रत्येकाने व्यक्तिगत पातळीवर करावयास हवा. भगवान महावीरांनी कोणत्याही देवाची अगर व्यक्तीची पूजा केली नाही, तर त्यांनी सदैव या मानवी मूल्यांचीच उपासना केली.

एखाद्या विषयावर साकल्याने सर्वंकष विचार करणे हा सम्यक दर्शनाचा विशेष आहे. त्यापुढील पायरी म्हणजे सम्यक ज्ञान आहे. अर्थात एखाद्या विषयाचे परिपूर्ण ज्ञान प्राप्त करवून घेणे. या दोन पायऱ्या आज जगाने बऱ्यापैकी गाठलेल्या आहेत. तथापि, अद्याप सम्यक चारित्र्यापर्यंतचा प्रवास आपल्याला करावयाचा आहे. त्यासाठी भगवान महावीरांचे तत्त्वज्ञान मुळापासून समजावून घेण्याची, अंगीकृत करण्याची गरज असल्याचेही ककडे यांनी सांगितले.

## अध्यासन केंद्राची ग्रंथमाला

महावीर अध्यासनातर्फे जैन धर्मातील २४ तीर्थंकर आणि त्यांच्या योगदानाची, शिकवणीची किमान माहिती लोकांना व्हावी, यासाठी २४ पुस्तकांची ग्रंथमाला प्रकाशित केली आहे. जैन धर्मातील कोणीही आंतरजातीय विवाह केला, तर जैन तत्त्वज्ञानाची माहिती त्यांना व्हावी, यासाठी हा संच भेट देण्याचा उपक्रम समाजात राबवला जात आहे.

25 APR 2021

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. अरुण निगवेकर द्रष्टे शिक्षणतज्ज्ञ

## शोकसंदेशात शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केली भावना

प्रतिनिधी
कोल्हापूर

ज्येष्ठ पदार्थवैज्ञानिक डॉ. अरुण निगवेकर यांच्या निधनामुळे भारताला लाभलेला द्रष्टा शिक्षणतज्ज्ञ काळाच्या पडद्याआड गेला आहे, अशी भावना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी शोकसंदेशात व्यक्त केली.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, डॉ. निगवेकर यांनी पदार्थविज्ञानाच्या



क्षेत्रात शास्त्रज्ञ म्हणून भरीव कामगिरी केली आहे. पुण्याच्या सावित्रीबाई फुले विद्यापीठाचे ते कुलगुरु होते. त्यानंतर विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष

- डॉ. शिर्के यांनी डॉ. निगवेकरांना वाहिली श्रद्धांजली
- निगवेकर यांच्या निधनामुळे देशाच्या शैक्षणिक क्षेत्राची हानी

म्हणूनही त्यांनी अत्यंत मोलाची कामगिरी बजावली. देशाच्या विविध शैक्षणिक समित्यांवर काम करून धोरणात्मक दिशा देण्याचे ही त्यांनी काम केले. बेंगळूर येथील नॅशनल असेसमेंट ॲण्ड ॲक्रिडिटेशन कौन्सिलच्या (नॅक) पायाभरणीत व उभारणीत त्यांचे मोठे योगदान राहिले.

ते नॅकचे पहिले संस्थापक, अध्यक्ष होते. भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी त्यांचा 'भारताच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे जनक' अशा शब्दांत गौरव केला होता. डॉ. निगवेकर यांचे कोल्हापूरशी तसेच शिवाजी विद्यापीठाशी अत्यंत स्नेहपूर्ण संबंध होते. येथील राजाराम महाविद्यालयाचे ते माजी विद्यार्थी होते.

सन २००३ मध्ये शिवाजी विद्यापीठाच्या ३९ व्या दीक्षांत समारंभास ते प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या निधनामुळे भारताच्या शैक्षणिक क्षेत्राची मोठी हानी झाली आहे, असेही डॉ. शिर्के यांनी आपल्या शोकसंदेशात सांगितले.

25 APR 2021 **पुण्यनगरी**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त ऑनलाईन वेबिनार

## विचारमंथनात देशभरातून २८० जणांचा सहभाग

**कुरुंदवाड : प्रतिनिधी**

कोरोनामुळे सर्वत्र हाहाकार माजला आहे. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात अनेक मर्यादा आल्या होत्या; परंतु इतिहास व राज्यशास्त्र विभागाने आगळ्यावेगळ्या पद्धतीने जयंती साजरी करण्याचे ठरविले. यामध्ये ऑनलाईन विचारमंथनास राज्यभरातून प्राध्यापक व विद्यार्थ्यांचा भरभरून प्रतिसाद मिळाला.

सहकारभूषण एस. के. महाविद्यालयाच्या वतीने तसेच राष्ट्रीय सेवा योजना इतिहास व राज्यशास्त्र विभाग आयोजित भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार या विषयावर एकदिवसीय ऑनलाईन वेबिनार मोठ्या उत्साहात झाले. याला राज्यभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या वैचारिक ऑनलाईन वेबिनारमध्ये देशभरातील सुमारे २८० प्राध्यापक, संशोधक आणि विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राजकीय तत्त्वज्ञान, सर्वांगीण विचार, आंबेडकरवादाची मूलतत्त्वे, तसेच शिक्षण, स्त्रियांविषयी विचार, सामाजिक योगदान, कोल्हापूरविषयी आठवणी अशा विविध विचारांची देवाणघेवाण या वेबिनारमध्ये करण्यात आली. डॉ. उमाकांत राठोड पैठण, डॉ. मिलिंद देशमुख सहसंचालक कार्यालय कोल्हापूर, डॉ. आदिनाथ इंगोले पूर्णा परभणी, डॉ. शिवानंद जाधव खर्डा, डॉ. राजेंद्र कुंभार, जयसिंगपूर आदी मान्यवरांनी ऑनलाईन मार्गदर्शन केले. तसेच सहकारभूषण एस. के. पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय. एम. चव्हाण यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. स्वागत व प्रोस्ताविक राज्यशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. एस. व्ही. कोठावळे, तर आभार इतिहास विभागाचे प्रमुख डॉ. डी. व्ही. सूर्यवंशी यांनी मांडले.